


दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले
dainiklokaarambh@gmail.com

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | मंगळवार ३१ डिसेंबर २०२४ | अंक२२० पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
९४०३६ ४१४८२
राहुल मारोतीराव वाईकर

## नवीन वर्षाच्या स्वागतासाठी महाराष्ट्र सज्ज, ठिकठिकाणी जय्यत तयारी

सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी महाराष्ट्र सज्ज झाला आहे. सध्या सर्वत्र आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. महाराष्ट्रात ठिकठिकाणी विविध पाट्यांचे आयोजन करण्यात आले आहे. २०२४ हे वर्ष संपण्यासाठी अवघे काही तास शिल्लक राहिले आहेत. त्यामुळे सध्या मुंबई, पुणे, नागपूर यांसह बहुतांश ठिकाणी नवीन वर्षाच्या स्वागताची जय्यत तयारी करण्यात आली आहे. नवीन वर्षाचे जल्लोषात स्वागत करण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्र सज्ज झाला आहे. विशेष म्हणजे आज रात्री मुंबई लोकलकडून विशेष लोकल सोडण्यात येणार आहेत. तर दुसरीकडे आज मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे.सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी आणि २०२५ या नवीन वर्षाचे स्वागत जल्लोषात करण्यासाठी हॉटेल्स, रेस्टॉरंट, पब, रिसॉर्टकडूनही तयारी करण्यात आली आहे. यानुसार विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. तसेच विविध लज्जतदार पदार्थांची मेजवानीही




असणार आहे. त्यासोबतच अनेकांच्या घरी हाऊस पार्टीचीही तयारी करण्यात येणार आहे. अनेकजण आपल्या मित्र-मैत्रिणी, कुटुंबियांसह नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी सज्ज झाले आहेत. तर बहुतांश पर्यटन स्थळांवरील हॉटेलचे बुकींग हाऊसफुल्ल झाले आहे. आज रात्री ठिकठिकाणी वैविध्यपूर्ण कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. विविध खाद्यपदार्थांचा आस्वाद घेत अनब लाईव्ह म्युझिक बँडच्या तालावर थिरकत न्यू इयर पार्टीचा जल्लोष ठिकठिकाणी केला जाणार आहे.कल्याणमध्ये आज पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त असणार आहे. या पार्श्वभूमीवर २ सहाय्यक पोलीस आयुक्त, ८३ अधिकारी, ५३२ अंमलदार तैनात असणार आहेत. त्यासोबत १७ ठिकाणी नाकाबंदी करण्यात आली आहे. तसेच २७ बीट मार्शल पेट्रोलिंग, २० मोबाईल पेट्रोलिंग ही असणार आहे. तसेच प्रतिबंधक, छेडछाडविरोधी, बार चेकिंग, तपास आणि गोपनीय पथकं अशी विशेष पथके कार्यरत असणार आहेत. तसेच ८ ब्रेथ एनालायझर, १० नाकाबंदी ठिकाणांवर कठोर कारवाई केली जाणार आहे.

पुण्यात सरत्या वर्षाला निरोपाच्या पार्टीवर नियंत्रण घालण्यासाठी ३००० पोलिस तैनात करण्यात आले आहेत. यामुळे दारू पिऊन गोंधळ घातल्यास कारवाई होणार आहे. नवीन वर्षाच्या पार्श्वभूमीवर ३१ डिसेंबर रोजी पुणे पोलिसांनी चांगलीच खबरदारी घेतली आहे. त्या अनुषंगाने सर्वच पोलिस ठाण्यांतर्गत तगडा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. यासोबतच पुणे शहरात ३ हजारांवर पोलिस अधिकारी आणि कर्मचारी बंदोबस्तासाठी तैनात असणार आहेत. त्यासोबत ८०० वाहतूक पोलिस कर्मचारी चौका-चौकांमध्ये तैनात असणार आहेत. पुणे शहरात प्रामुख्याने २७ महत्त्वांच्या ठिकाणांवर ड्रंक अँड ड्राइव्हची कारवाई केली जाणार आहे.

नाशिकमध्ये नवीन वर्षाच्या नाशिककर सज्ज झाले आहेत. या पार्श्वभूमीवर नाशिकचे पोलीस प्रशासन सज्ज झाले आहे. नाशिक शहरातील ६५ स्पॉटवर ड्रिंक अँड ड्राईव्हची नाकाबंदी करण्यात आली आहे. तसेच थर्टी फर्स्टच्या पार्श्वभूमीवर तीन हजार पोलिसांचा फौजफाटाही तैनात करण्यात आला आहे. तसेच २०० पोलीस अधिकारी, ३००० पोलीस अंमलदार आणि सहाशे होमगार्डही रस्त्यावर असणार आहेत. यासोबतच गुंडाविरोधी पथक, अमली पदार्थ विरोधी, गुन्हे शोध पथक, बॉम्ब शोधक पथकही तैनात असणार आहेत. महिलांच्या सुरक्षेसाठी दामिनी ,फिरस्ती पथक सीआर मोबाईल हे पोलिसांचे फिरस्ती पथकही सज्ज आहेत. अवघ्या चार मिनिटात ही पथक प्रतिसाद देणार आहेत.

## मा.पुरुषोत्तम खेडेकर यांच्या अमृतमहोत्सवीय अभिष्टचिंतन सोहळ्यास बीड येथून शेकडो पदाधिकारी पुणे येथे जाणार



बीड प्रतिनिधी बीड: मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष मा.पुरुषोत्तम खेडेकर यांच्या अमृतमहोत्सवीय अभिष्टचिंतन सोहळ्यास ४-जानेवारी रोजी बीड जिल्ह्यातून मराठा सेवा संघ संभाजी ब्रिगेड जिजाऊ ब्रिगेडचे शेकडो पदाधिकारी कार्यक्रमास पुणे येथे रवाना होणार असल्याचे मराठा सेवा संघाच्या वतीने कळविण्यात आले. मा.पुरुषोत्तम खेडेकर यांचा ४- जानेवारी रोजी बालगंधर्व रंगमंदिर पुणे येथे अमृत महोत्सवीय अभिष्टचिंतन सोहळा संपन्न होणार असून त्यानिमित्त मराठा सेवा संघ व ३३ कक्षांच्या वतीने बीड जिल्ह्यातील सर्व तालुकास्तरावर आरोग्य शिबिरे वृक्षारोपण शैक्षणिक साहित्य वाटप अजीवन सभासद नोंदणी आदी कार्यक्रम घेण्यात येणार आहेत.

## संपादक बाबा देशमाने यांना मातृशोक

माजलगाव । प्रतिनिधी ज्येष्ठ पत्रकार, संपादक बाबा देशमाने यांच्या मातोश्री लक्ष्मीबाई श्रीहरी देशमाने (वय ६७) यांचे आज रविवार, दिनांक २९ डिसेंबर रोजी सकाळी ६ वाजता निधन झाले. लक्ष्मीबाई देशमाने यांच्या पार्थिवावर अतिशय शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. गेली दोन महिने लक्ष्मीबाई देशमाने यांच्यावर बीड येथील एका खाजगी रूग्णालयात उपचार सुरू होते. उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी, सुना आणि नातवंडे असा परिवार आहे. अतिशय मनमिळाऊ स्वभावाच्या म्हणून त्यांची ओळख होती. चाटगाव ता.धारूर जि.बीड येथे लक्ष्मीबाई देशमाने यांच्या पार्थिवावर अतिशय शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. या अंत्यविधीला पंचक्रोशीतील प्रतिष्ठित नागरिक आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती. दरम्यान, मुंबई येथून प्रसिद्ध होणाऱ्या आरोग्यदूतचे संपादक बाबा देशमाने यांच्या त्या मातोश्री होत्या

## संस्कार इंग्लिश स्कूलच्या स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांचे गुणदर्शन



बीड : संस्कार प्रबोधिनी संचलित संस्कार इंग्लिश स्कूलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन २०२४ विविध उपक्रमाने साजरे झाले
संमेलनात एलकेजी ते आठवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी मराठी हिंदी तसेच धार्मिक विविध गाण्यावर नृत्य करत आपला आविष्कार सादर केला स्नेहसंमेलनात प्रमुख पाहुणे म्हणून गुरुकुल इंग्लिश स्कूल विद्यालयाचे प्राचार्य श्री सर्वज्ञ सर हे होते तर व्यासपीठावर संस्थेचे सचिव श्री कालिदासरावजी थिगळे साहेब, सुनीलराव क्षीरसागर साहेब , दिलीपराव ख्रिस्ती साहेब, राजेंद्र प्रसाद साहेब, पाठक साहेब, यांच्या हस्ते बक्षिसाचे वाटप करण्यात आले तसेच विद्यालयाच्या प्राचार्या सुजा चोको यांनी विद्यालयातील विविध कार्यक्रमाची वार्षिक आढावाची प्रस्तावना केली उपप्राचार्य जॉन सर यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगती बद्दल इतिवृत्त बोलताना सांगितला यावेळी संमेलनाच्या यशस्वीतेसाठी शाळेच्या सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांनी परिश्रम घेतले

## आ.भीमराव केराम यांचा पत्रकारांच्या वतीने सत्कार



नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट किनवट माहूर विधानसभेचे भाजपा आमदार भीमराव केराम हे आपल्या विकास कामाच्या व जनतेच्या विश्वासावर तिस-यांदा आमदार पदी विराजमान आल्याबद्दल त्यांचा किनवट तालुका मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने त्यांच्या निवासस्थानी शाल श्रीफळ देऊन येतोचित सत्कार करण्यात आला.यावेळी माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार माजी उपनगराध्यक्ष श्रीनिवास नेम्मानिवार मराठी पत्रकार परिषदचे तालुका अध्यक्ष प्रमोद पोहरकर,सचिव बालाजी सिरसाट,कार्याध्यक्ष किरण ठाकरे,ज्येष्ठ पत्रकार प्रदीप वाकोडीकर, राघू मामा,के मूर्ती,बापूसाहेब तुपेकर,शिवाजी काळे,माधव सूर्यवंशी,बबनराव वानखेडे आदी पत्रकार उपस्थित होते.

## हजर व्हावे की नाही यावरुन आका अन् मोठा आका यांच्यात द्वंद-आ.सुरेश धस

बीड दि.३० (बातमीदार): मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मिकी कराड फरार आहे. त्यांचा शोध सुरु आहे. परंतु रविवारपासून तो पोलिसांना शरण येणार असल्याच्या बातम्या येत आहेत. तसेच त्याला आज पुण्यात अटक झाल्याची अफवाही पसरली होती. यासर्व प्रकरणात आमदार सुरेश धस यांनी भाष्य केले आहे. ते म्हणाले, जोपर्यंत सीआयडीकडून कन्फर्म माहिती येत नाही तोपर्यंत आका आत गेले की नाही ते सांगणार नाही. सध्या आका आणि त्याचा मोठा आका यांच्या द्वंद्व सुरु आहे. हजर व्हावे की होऊ नये, असे हे द्वंद आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी तपासात अडथळा येईल, असे वक्तव्य करु नये, असे म्हटले आहे. त्यावर सुरेश धस यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली. ते म्हणाले, चंद्रशेखर बावनकुळे माझे नेते आहेत. राज्याचे नेते आहेत. त्यांनी सांगितल्याप्रमाणे कोणत्याही बाबतीत तपासात अडथळा आम्ही आणणार नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वाल्किकी करडा आणि इतर गुन्हेगारांची संपत्ती जप्त करण्याचे आदेश दिले आहे. त्यावर आमदार सुरेश धस यांनी मुख्यमंत्र्यांचे कौतूक केले आहे. मुख्यमंत्र्यांनी सर्व यंत्रणेस जोराने कामाला लावले आहे. १५० ते २०० च्या स्पीडने पोलीस यंत्रणा काम करत आहे. त्यांची संपत्ती जप्त होणार आहे. त्यांच्या संपत्तीची जी माहिती आहे, तीसुद्ध मी देणार आहे.

## जिल्ह्यात १२ जानेवारी च्या मध्यरात्रीपर्यंत मनाई आदेश जारी

बीड, दि. २९:- मराठा, ओबीसी,धनगर समाजाचे आरक्षण मागणी अनुषगांने आंदोलने चालू आहेत तसेच आगामी कालावधीत नुतन वर्षे साजरे होणार आहे.सध्या बीड जिल्ह्यामध्ये पोलीस स्टेशन केज येथे दाखल असलेल्या गुन्हयाच्या अनुषंगाने विविध राजकीय पक्ष व संघटना यांच्याकडून सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने त्यांच्या मागणी करीता अचानक आंदोलन करत आहेत. राजकिय पक्ष संघटनेच्या वतीने त्यांच्या न्याय मागण्यासाठी विविध प्रकारचे निदर्शने, आंदोलने, उपोषण, मोर्चे होण्याची शक्यता असून अचानक घडणारे घटनावरुन व किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच आरक्षणच्या मागणीसाठी सर्व समाज व राजकीय पक्ष आक्रमक आहे या करिता कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी मनाई आदेश जारी करण्यात आले असल्याचे अपर जिल्हादडाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रसिध्दी पत्रकात नमूद केले आहे.दिनांक २९ डिसेंबर २०२४ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते १२ जानेवारी २०२५ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहावी या करीता कलम ३७ (१) (३ ) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे.शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या जवळपास खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे.या अन्वये शस्त्र, सोटे ,काठी, तलवार, बंदूक, लाठया, काठया, कोणतेही दाहक पदार्थ, किंवा स्फोटके, दगड, किंवा इतर क्षेपाणस्त्रे, शरीरास इजा होणा-या वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. आवेशी भाषणे, अंगविक्षेप, विडांबनात्मक नकल, सभ्यता, नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षिता धोक्यात येईल, किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा फलक किंवा इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगू नये. जाहिरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे किंवा कोणतीही कृती जे देशाच्या संविधानातील मुल्यांच्या विरुध्द असेल किंवा देशाचा मान व सार्वभौमत्व यांना इजा पोहचणार असेल किंवा सार्वजनिक सुरक्षा आणि सामाजिक सलोखा यांना हानी पोहचणारी असेल, व्यक्तीच्या किंवा शवांच्या किंवा प्रेते किंवा आकृती,किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन यासाठी मनाई आहे. पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येता येणार नाही, मिरवणूका मोर्चे काढता येणार नाही. कोणताही मोर्चा, सभा, मिरवणूक व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिका-यांची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूकीस लागु राहणार नाहीत व अशी कोणतीही मनाई राज्य शासनाच्या मंजूरीशिवाय १५ दिवसापेक्षा जास्त मुदतीपर्यंत अमलात राहणार नाही.

# कायदा-सुव्यवस्था काय असते हे अजित पवार दाखवतील-खा.सोनावणे

बीड दि.३० (बातमीदार): उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बीड जिल्ह्याचे पालकमंत्रीपद घ्यावं असं वक्तव्य राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे खासदार बजरंग सोनावणे यांनी केलं आहे. भाजपा आमदार सुरेश धस यांनी बीड जिल्ह्याचे पालकमंत्रीपद हे फडणवीसांनी घ्यावे अशी मागणी केलेली आहे. यानंतर आता खासदार सोनावणेंनी अजित पवारांनी बीडचे पालकमंत्रीपद घ्यावं असं वक्तव्य केलं आहे. लोकशाहीच्या चौथा स्तंभ असलेल्या मीडियाला या तपासा बाबतीत कोणतीही माहिती दिली जात नाही असेही सोनावणे म्हणाले. लोकप्रतिनिधी म्हणून मला देखील माहिती मागितल्यावर दिली जात नाही. पण किमान २४ तासानंतर तर माहिती जाहीर केली पाहिजे. आरोप असलेल्या लोकांचे सरकारमधील पक्षाशी संबंध आहेत, त्यामुळे संशय बाळवत असल्याचे सोनावणे म्हणाले. मी सीबीआय कडे तपास द्या अशीच मागणी केली होती असे सोनावणे म्हणाले. या संदर्भात मी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याकडे मागणी केली होती. त्यांनी तसा शब्द दिला होता असे सोनावणे म्हणाले. अमित शाह स्वतः तपासावर लक्ष ठेवून आहेत, त्यामुळे बरं चाललं आहे नायतर हे कुठं गेलं असतं माहित नाही असेही सोनावणे म्हणाले. संतोष देशमुख यांच्या हत्येला २२ दिवस झालेत, पण आरोपी अद्यापही सापडले नाहीत, आधी आरोपी तर अटक करा. मास्टर

## धनंजय मुंडे यांनी स्वतः सांगितलं की खंडणीतील आरोपी आणि माझे संबंध आहेत.

माईंड कोण आहेत हे पोलिसांनी शोधावं मी नावं घेणार नाही असेही सोनावणे म्हणाले. बीडमध्ये कायदा आणि सुव्यवस्था राहिलेली नाही- धनंजय मुंडे यांनी स्वतः सांगितलं की खंडणीतील आरोपी आणि माझे संबंध आहेत. त्यांनी मुख्यमंत्र्यांची भेट का घेतली हे माहिती नाही, त्याच्यावर तेच स्पष्ट सांगू शकतील असेही सोनावणे म्हणाले. बीडमधल्या जन्मलेला मुलालाही माहिती की इथ काय घडतंय असे सोनावणे म्हणाले. महाराष्ट्राच्या जनतेसाठी मी सांगतो की बीडमध्ये कायदा आणि सुव्यवस्था राहिलेली नाही. कायदा आणि सुव्यवस्था राखायचे असेल तर एसपी बदला असे मी सांगितले होते. मुख्यमंत्र्यांचे आभार त्यांनी एसपी बदलले असेही सोनावणे म्हणाले. पण केवळ एसपी बदलून चालणार नाही. नवीन एसपींना माझ सांगण आहे की, पोलीस स्टेशनचे निरीक्षक काय धंदे करतात? त्यांना देखील बदलणे गरजेचं असल्याचे सोनावणे म्हणाले. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बीडचे पालकमंत्रीपद घेऊ शकतात की नाहीत हे माहिती नाही. पालकमंत्री कोणाला द्यावं हा त्यांचा प्रश्न आहे. पण अजितदादांनी किमान त्यांचे सोंगाडी काय करतात बीड जिल्ह्यात हे पाहण्यासाठी तर पालकमंत्री पद घ्यावं असा टोला सोनावणे यांनी लगावला. कायदा आणि सुव्यवस्था काय असते हे अजित पवार दाखवू शकतात असेही सोनावणे म्हणाले.

## संपादकीय

### एकाच नाण्याच्या दोन बाजू

आर्थिक विकास व्हावा, असे सगळ्यांनाच वाटते. त्याच वेळी प्रदूषण मात्र सर्वांनाच नकोसे असते. परंतु जवळ जवळ सर्वच देशांचा प्रत्यक्ष अनुभव असा आहे की, जेथे विकास आहे तेथे प्रदूषणही आहे. निदान विकासाच्या प्रक्रियेतील सुरुवातीची कित्येक दशके विकास आणि प्रदूषण एकत्र नांदताना दिसतात. प्रदूषणाविना विकास हे अजून तरी प्रत्यक्षात घडलेले दिसत नाही, हे वास्तव आहे. हे पाहता, जणू काही विकास आणि प्रदूषण या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, असे दिसते. यामागे काय कारणे असावीत, याचा शोध घेण्याचा प्रयत्न आपण करणार आहोत. विकासाअंतर्गत संबंधित देशाचे एकूण राष्ट्रीय उत्पन्न तसेच दरडोई उत्पन्न वाढले पाहिजे. सध्या भारत, चीन आणि अमेरिका यांचे दरडोई वार्षिक उत्पन्न अनुक्रमे २७००, १३,००० आणि ३८,००० डॉलर इतके आहे. आता, विकास साधायचा म्हणजे काय करायचे? तर, जनतेचे जीवनमान उंचावले पाहिजे. तसेच, जनतेसाठी उपभोगाच्या वस्तू आणि सेवा यामध्ये विविधता आली पाहिजे. उपलब्ध होणाऱ्या वस्तू आणि उपलब्ध सेवा जास्तीत जास्त लोकांना परवडल्या पाहिजेत. देशातील शिक्षण आणि आरोग्य या सेवा सर्वांना उपलब्ध असाव्यात. एकूणच सर्वार्थाने मानवी विकास घडून आला पाहिजे. असे सगळे होत असेल तर विकास घडून आला, असे होईल. आता जरा प्रदूषणाविषयी. कार्बन डायऑक्साइड हा विषारी वायू हवेत सोडणे म्हणजे प्रदूषण करणे होय. म्हणजे कार्बनचे हवेत उत्सर्जन! हे मोजण्यासाठी ङ्गएमटीसीओटूफ (चींउज२) हे मोजमाप वापरले जाते. याचा अर्थ ङ्गमेट्रिक टन कार्बन डायऑक्साइडफ असा आहे. एखाद्या देशाचे कार्बन उत्सर्जन जर २ एमटीसीओ२ असेल त्याचा अर्थ असा की, हा देश दर वर्षी दोन हजार टन कार्बन डायऑक्साइड हवेत सोडतो. ज्यामुळे अर्थातच हवेचे प्रदूषण होते. या संबंधात उद्बोधक आकडेवारी सन १८५० आणि २०२२ या वर्षांसाठी उपलब्ध आहे. सन १८५०मध्ये दर वर्षी इंग्लंड १२४, तर जर्मनी केवळ १६, तर अमेरिका २१ असे कार्बनचे उत्सर्जन म्हणजे प्रदूषण होते. या आकडेवारीनुसार इंग्लंड हा तेव्हाचा मोठा प्रदूषक होता. तर जर्मनी त्या तुलनेत नगण्य. साधारण दीडशेपावणे दोनशे वर्षांनंतर, सन २०२२मध्ये परिस्थिती पूर्णपणे बदलली. सन २०२२मध्ये इंग्लंड ३८४, जर्मनी ६७०, अमेरिका ५०८० तर चीन तब्बल ११,९०० एमटीसीओटू असे कार्बनचे उत्सर्जन झाले. गेल्या काही वर्षांत अमेरिका आणि चीन हे नवे प्रदूषक पुढे आले आहेत. हवेमध्ये प्रदूषण वाढले. हवा अशुद्ध झाली; कारण चीन, अमेरिका यासारखे उद्योगप्रधान, श्रीमंत देश फार मोठ्या प्रमाणावर कार्बन उत्सर्जन करू लागले. सध्या अमेरिका आणि चीन मिळून दर वर्षी १६ हजार ९८० मेट्रिक टन इतका कार्बन हवेत सोडत आहेत. मग हवा अशुद्ध होणारच यात नवल नाही. गेल्या साधारण १५० वर्षांमध्ये झालेले प्रचंड आधुनिक औद्योगिकीकरण आणि त्यासाठी आवश्यक ती ऊर्जा निर्माण करण्यासाठी प्रचंड प्रमाणावर होत असलेले कोळसा आणि खनिज तेल यांचे ज्वलन हे वाढत्या प्रदूषणाचे मुख्य कारण आहे. अठराव्या शतकातील इंग्लंडची औद्योगिक क्रांती संपूर्णपणे कोळशावर आधारलेली होती. संपूर्ण जगाचा विचार केल्यास ऊर्जा (वीज) निर्मितीसाठी आजही प्रदूषणकारी कोळसा हेच मुख्य इंधन आहे. चीन आणि भारत या दोन्ही आकाराने व लोकसंख्येने मोठ्या देशांत वीज निर्मितीसाठी कोळशाचाच अधिक वापर होत आहे. चीन ८० टक्के तर भारत ७० टक्क्यांच्यावर कोळशावर ऊर्जेसाठी अवलंबून आहेत. औद्योगिकीकरणाबरोबरच आधुनिक वाहतुकीच्या साधनांना खनिज तेलाची गरज असते. येथेही ज्वलन आणि त्यामुळे कार्बन उत्सर्जन आहेच. भरीस भर म्हणजे विकासाअंतर्गत दरडोई होणारे कार्बन उत्सर्जनसुद्धा अनेक पटीने वाढले आहे. घरगुती वापरामध्येसुद्धा लोक मोठ्या प्रमाणावर विजेचा (म्हणजे पर्यायाने कोळसा, तेल, नैसर्गिक गॅस यांचा) वापर करून प्रदूषणात भर टाकीत आहेत. आज जगामध्ये दरडोई कार्बन उत्सर्जन असे आहे – भारत केवळ २ एमटीसीओ२, इंग्लंड ५, जर्मनी ७, चीन ९. त्याच वेळी अमेरिकेचे हे उत्सर्जन दर वर्षी तब्बल १४ एमटीसीओ२ इतके आहे. एकूणच आधुनिक आर्थिक विकासापाठोपाठच प्रदूषणसुद्धा जन्मास आले आहे. जणू काय जुळे भाऊच! अ) आर्थिक गांधीवाद : विकासाच्या या मार्गामध्ये शेती क्षेत्र, लहान कामगारसघन उद्योग, कुटिरोद्योग यांना प्राधान्य असते. उत्पादनासाठी यंत्रे वापरणे निषिद्ध असते. शहरापेक्षा खेड्यांच्या विकासाला अधिक प्राधान्य असते. या मार्गामध्ये प्रदूषण खूपच कमी असते. परंतु त्याचबरोबर येथे कामगारांची उत्पादकता कमी असल्यामुळे संपत्ती अगदी कमी निर्माण होते. परिणामी असा समाज दरिद्री असतो, गरीब असतो. अशा समाजाचे जीवनमान खालच्या दर्जाचे असते. उत्पादनात विविधता नसते. समाजातील व्यक्तींची आयुर्मर्यादाही कमी असते. सन १९५०पूर्वी भारतामध्ये सर्वसाधारणपणे आर्थिक गांधीवादच होता.

# ढगाळ वातावरणात रब्बी पिकांची घ्या विशेष काळजी

## शेती अभ्यासक चिंचवडे यांचा सल्ला

राज्यात गेल्या ७-८ दिवसांपासून ढगाळ वातावरण निर्माण झाले आहे. चालू रब्बी हंगामातील पिकांच्या वाढीवर परिणाम दिसून येत आहे. त्यामुळे यंदाचा रब्बी हंगाम उत्पादन देईल कि नाही अशी चिंता शेतकरी व्यक्त करत आहेत,

आणखी काही दिवस ढगाळ वातावरण राहिल्यास गव्हावर तांबेरा रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. तसेच अशा वातावरणामुळे भाजीपाला, फळपिके, हरभरा आदि पिकांवरही किडी-रोगांचा प्रादुर्भाव वाढण्याची भीती शेतकरी वर्गाकडून व्यक्त केली जात आहे. कांद्याची रोपे लागवडीस तयार झाली असून पश्चिम महाराष्ट्रात कांदा लागवड सुरु झाली आहे. पहाटे पडणारे धुके झाडण्यासाठी कांदा उत्पादकांची धावपळ होताना दिसत आहे. ढगाळ वातावरणामुळे पिकांवर कीड-रोग व्यवस्थापनासाठी अधिक फवारण्या कराव्या लागत असल्याने खर्चही वाढण्याची शक्यता आहे. तसेच राज्यात ठिकठिकाणी रिमझिम पाउस पडला. त्यामुळे योग्य त्या उपाययोजना वेळीच करणे अत्यंत महत्वाचे आहे. ढगाळ वातावरण आणि पावसामुळे वातावरणातील आर्द्रता वाढते. त्यामुळे



पिकांवर बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर पाहायला मिळतो. ढगाळ वातावरणामुळे पिक पिवळे पडणे हि देखील मोठी समस्या जाणवते. पिक पिवळे पडण्याचं मुख्य कारण म्हणजे ढगाळ वातावरण आणि सततच्या पावसामुळे पिकांच्या मुळ्या अन्नद्रव्ये शोषून घेऊ शकत नाही त्यामुळे पानांमधील अन्न निर्मितीची प्रक्रिया थांबते. ढगाळ वातावरणामध्ये हरभरा, गहू आणि भाजीपाला पिकांमध्ये पाने खाणारी अळी आणि रसशोषक किडींचा अधिक प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते त्यासाठी अमील अर्क आणि दशपर्णी अर्क १० मिली प्रती लिटर याप्रमाणात घेऊन फवारणी करावी. त्यांनतरची लगेचच आठ दिवसांनी ५% निंबोळी अर्काची फवारणी घेणे आवश्यक आहे. या दोन्ही फवारन्यांनी फरक वाटत नसेल ग्रीन प्लानेट या कंपनीचे पेस्टो हिट प्लस फवारता येते. पिकावर बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव वाटत असेल तर बायोमिक्स १० ग्राम प्रती लिटर या प्रमाणात घेऊन फवारणी करावी. बायोमिक्सची फवारणी करणे शक्य नसेल तर अशा वेळी विमील अर्क देखील फवारता येते. फवारणी करताना स्टीकरचा वापर करावा जेणेकरून परिणाम अधिक चांगला मिळतो. किडींचे नियंत्रण करत असताना नैसर्गिक पद्धतींचा हि वापर करावा. पिकांमध्ये इंग्रजी ढ आकाराचे एकरी २०-२५ पक्षी थांबे लाऊन टाकावेत. घाटे व पाने खाणा-या अळीचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी एकरी ५-६ कामगंध सापळे लावावेत. कीड-रोग प्रादुर्भाव ग्रस्त झाडे उपटून शेताबाहेर नेऊन नष्ट करावीत. पिकामध्ये तन नियंत्रण ठेवून किडींना पूरक असलेल्या सर्व प्रकारच्या खाद्य वनस्पतींचा नाश करावा.

पिकांच्या जोमदार वाढीसाठी प्रखर सूर्यप्रकाश असणे अत्यंत महत्वाचे आहे. ढगाळ आणि पावसाच्या वातावरणात सूर्यप्रकाश नसल्याने पिकांची वाढ खुंटते आणि पाने पिवळी पडतात. अशा वेळी फवारणी करताना सोबत अमिनो असिडचा वापर करावा. अमिनो असिड बाजारातून विकत न घेता घरीच ईएम २ सोलुशन वापरून बनवलेला मासा अर्क १० मिली प्रती लिटर पाणी या प्रमाणात घेऊन फवारणी केल्यास उत्तम रिझल्ट मिळतात. अमिनो असिड किंवा मासा अर्क ऐवजी कोणतही सीवीड एक्ष्ट्रक्ट देखील वापरता येते. यामुळे पिक पिवळे पडण्याची समस्या कमी होते असा सल्ला पल्लवी चिंचवडे यांनी शेतक-यांना दिला आहे.

**पल्लवी चिंचवडे-**
**सेंद्रिय शेती अभ्यासक**

# अग्रलेख सर्वपक्षीय आक्रोश!

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाचे पडसाद राज्यभर उमटत आहेत. देशमुख यांच्या मारेक-यांना तात्काळ अटक करावी तसेच या प्रकरणाचा सोक्षमोक्ष लागेपर्यंत धनंजय मुंडे यांनी मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा, या मागणीसाठी काढण्यात आलेल्या सर्वपक्षीय मूक मोर्चात जनतेचा आक्रोश पहायला मिळाला. शनिवारी सकाळी ११ वाजता निघालेला हा सर्वपक्षीय मोर्चा बीडच्या डॉ. आंबेडकर चौकातून माळीवेस, अण्णा भाऊ साठे चौक, बस स्टँड, छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून पोलिस अधीक्षक कार्यालयापर्यंत पोहोचला. या मोर्चात राष्ट्रवादी (शरद पवार गट) काँग्रेस पक्षाचे नेते आमदार जितेंद्र आव्हाड, आ. संदीप क्षीरसागर, राष्ट्रवादीचे (अजित पवार), आ. प्रकाश सोळंके, भाजप आ. सुरेश धस, अभिमन्यू पवार, माजी खासदार संभाजीराजे छत्रपती, मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे-पाटील, माजी आ. बच्चू कडू अशी सर्वपक्षीय नेतेमंडळी आणि प्रचंड संख्येने नागरिक सहभागी झाले होते. मोर्चात मृत संतोष देशमुख यांची दोन्ही मुले, पत्नी तसेच बंधू धनंजय देशमुख यांचाही सहभाग होता. परभणीत आंबेडकरी विचाराच्या सुशिक्षित तरुणाचा पोलिस मारहाणीत झालेला मृत्यू हा पोलिसांनी केलेली हत्याच आहे. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या झाली. या दोन्ही घटनांवर जनतेने व सत्ताधारी पक्षाच्या लोकांनी वस्तुस्थिती मांडली आहे. पण महायुती सरकार हे मान्य करत नाही. हे सरकार प्रायोजित असल्याने सीआयडी चौकशी केली तरी त्यातून काही निष्पन्न होणार नाही, अशी टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली होती. तर शिवसेना(ठाकरे) नेते संजय राऊत यांनी याला शहरी नक्षलवादाचे नाव दिले असून हा नक्षलवाद भाजपच्या लोकांकडेच आहे. या नक्षलवादाचे कमांडर मुख्यमंत्री फडणवीस हेच असल्याची टीका त्यांनी केली होती. संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी गुरुवारी राज्य गुन्हे अन्वेषणचे अप्पर पोलिस महासंचालक प्रशांत बोरुडे यांनी केज येथे जाऊन आढावा घेतला होता. देशमुख हत्याप्रकरणी राज्य सरकारने सीआयडीतील उपमहानिरीक्षक बसवराज तेली यांच्या नेतृत्वाखाली विशेष तपास पथकाची (एसआयटी) नियुक्ती केली आहे. बीडमध्ये हजारोंच्या संख्येने निघालेल्या मोर्चात सर्वच नेत्यांनी अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडेंवर हल्ला चढवत त्यांच्या राजीनाम्याची एकमुखी मागणी केली. यावेळी बोलताना भाजप आमदार सुरेश धस म्हणाले, बीडमध्ये दहशतीचे वातावरण आहे. ङ्गगोली मार भेजे मेंफ नाहीतर ङ्गगोली मार किधरभीफ असे सुरू आहे. आतापर्यंत इथे अनेक हत्या झाल्या. या लोकांनी अनेकांचे संसार उद्ध्वस्त केले, जमिनी लाटल्या.. अशा लोकांना बिनभाड्याच्या खोलीतच पाठवायला हवे. धनंजय मुंडेंचा राजीनामा घ्या. अनेकांकडे बंदुकीचे परवाने आहेत. हे परवाने ज्यांनी दिले त्या सर्वांवर कारवाई झाली पाहिजे. आम्ही पाच वेळा आमदार झालो पण आम्हालाही या ठिकाणी सुरक्षा मागावी लागते असेही आमदार धस म्हणाले. संतोष देशमुख यांची हत्या होऊन तीन आठवडे उलटले तरीसुद्धा काही आरोपी अद्याप मोकाट आहेत. या प्रकरणाचा वाल्मिक कराड ङ्गआकाफ असल्याचे बोलले जाते. त्यांच्यावर संशयाची सुई आहे परंतु त्यांना ताब्यात घेण्यात आलेले नाही. परळी तालुक्यात गोदावरी नदीतून रोज वाळूचा उपसा होतो. वाल्मिक कराड यांच्या मागे ज्यांनी शक्ती उभी केली ते धनंजय मुंडे मंत्रिमंडळात असेपर्यंत या प्रकरणात न्यायाची अपेक्षा नाही. संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा जोपर्यंत निकाल लागत नाही तोपर्यंत मुख्यमंत्री फडणवीस यांनी धनंजय मुंडे यांचे मंत्रिपद काढून घ्यावे अशी सर्वसामान्य जनतेची मागणी असल्याचे सांगितले जाते. संभाजीराजे छत्रपती यांनी अजित पवारांना सरळ सरळ आव्हान देताना म्हटले आहे की, तुमच्यात धमक असेल तर धनंजय मुंडेंची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करा. तुमची काम करण्याची पद्धत परखडपणाची असेल तर तुम्ही करेक्ट कार्यक्रम करा. तुम्हाला बीडचा बिहार करायचा आहे का? असा सवालही त्यांनी केला. देशमुख यांच्या हत्येवरून वादाच्या भोव-यात सापडलेले मंत्री धनंजय मुंडे यांनी गुरुवारी मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेऊन आपली बाजू मांडली होती. देशमुख यांची हत्या करणारे गुन्हेगार आणि त्यामागचे सूत्रधार यांना फाशीची शिक्षाच देण्यात यावी अशी आपली पहिल्या दिवसापासूनची मागणी आहे असे सांगून या घटनेवरून आपल्याला राजकीय व सामाजिक जीवनातून उठविण्याचा काहींचा डाव असल्याचा आरोपही मुंडे यांनी केला होता. माजलगाव तालुक्यातील सर्व राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन जमा केलेला ४० लाख रुपयांचा निधी देशमुख कुटुंबाला देणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे. देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी फरार आहेत. या आरोपींना अटक होत नसल्याने बीडमध्ये सर्वपक्षीय मोर्चा काढण्यात आला. या प्रकरणाची गंभीर दखल घेत मुख्यमंत्री फडणवीस यांनी हत्या प्रकरणातील फरार आरोपींची संपत्ती जप्त करण्याचे आदेश सीआयडीला दिले आहेत. तसेच बंदुकीसोबत ज्यांचे फोटो आहेत, ते खरे असतील तर त्या सर्वांचे परवाने रद्द करण्याचा आदेश दिला आहे. मोर्चातील आंदोलकांनी निषेध म्हणून काळ्या फिती बांधून, काळे झेंडे व निषेधाचे पोस्टर हातात घेतले होते. संतोष देशमुख यांची मुलगी वैभवी देशमुखने कळकळीचे आवाहन करताना म्हटले की, माझ्या वडिलांची हाल हाल करून हत्या करण्यात आली.

# शासकीय अधिकारी,कर्मचारी सरपंच यांनी जनतेच्या हिताची कामे करण्यासाठी सकारात्मक रहावे-आ.धस

आष्टी । प्रतिनिधी ज्या शासकीय अधिकाऱ्यांना जनतेच्या हिताची कामे करण्याचा कंटाळा न ठेवता शासनाच्या योजनांची माहिती देण्यात तत्परता दाखवावी अशी अपेक्षा सुरेश धस यांनी व्यक्त केली आहे. मात्र ज्यांना जनतेच्या हिताची ही कामे करावयाचे नसतील त्यांनी इतरत्र बदली करून जावे असा इशाराही आ.सुरेश धस यांनी दिला आहे.. आष्टी,पाटोदा, शिरूर (कासार) विधानसभा मतदारसंघातील.. सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्र या संघटनेच्या आष्टी पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील संघटनेचे सदस्य सरपंच,उपसरपंच,तसेच ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक संघटना,ग्रामरोजगार सेवक संघटना, व कृषी विभाग अधिकारी-कर्मचारी संघटना यांनी आयोजित केलेली संयुक्त संवाद बैठक आज आष्टी येथे संपन्न झाली. त्यामध्ये प्रमुख मार्गदर्शन करताना ते बोलत होते. ए.आर.अंतुले साहेबांनंतर सरपंचांची बाजू खंबीरपणे मांडणारे आणि समोर आलेले प्रश्न अभ्यासू वृत्तीने न्यायिक पद्धतीने सोडवणारे नेतृत्व म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब आहेत.ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये सरपंचाचीत्र्ह थेट निवडणूक करण्याचा क्रांतिकारी निर्णय फडणवीस साहेब यांनीच घेतला.यामुळे चांगल्या माणसांना गाव खेड्यात काम करण्याची संधी मिळत आहे. सरपंचांनी देखील प्रशासनाशी आणि लोकप्रतिनिधींशी समन्वय



ठेवून काम केले पाहिजे. गावचे प्रथम नागरिक या नात्याने सर्व सरपंच, उपसरपंच आदींनी शासनाच्या नवनवीन योजना माहिती करून घेणे आणि त्यांची अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.त्यासाठी वाचन संस्कृती अंगीकृत करणे आवश्यक आहे.त्यामुळे शासनाच्या नवनवीन योजना,शासकीय नियमावली समजण्यास सोपे जाते.नमो योजना,शबरी योजना या योजना लोकसंख्या विचारात घेऊन राबविल्या पाहिजे. यासाठी नवीन जीआर काढण्यासाठी मी पाठपुरावा करणार असल्याचे सांगत,राज्याचे नेतृत्व हे सकारात्मक आणि कल्पक माणसाच्या हातात आहे.त्यामुळे अधिकाऱ्यांनी तात्काळ निर्णय घेण्याचे काम करावे १० निर्णय घ्या पैकी काही चुकतील परंतु जो चुकेल तोच काम करेल हे मला कळतंय त्यामुळे काम करत रहा असे सांगत आ.धस म्हणाले की,सीना मेहकरी,खुंटेफळ साठवण योजना हा फकड्याच पूर्ण करणार आहे. ज्या योजनेसाठी ग्रामस्थांकडून दगड गोटे खाल्ले ज्या योजनेची सुरुवात मी केली त्या सीना मेहकरी आणि खुंटेफळ साठवण तलावाची योजना लवकरच पूर्ण होणार असल्याचे यावेळी धस म्हणाले.या संवाद बैठकीला सरपंच परिषद मुंबई, महाराष्ट्र या संस्थेचे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे, गटविकासधिकारी आष्टी सचिन सानप , गटविकास अधिकारी पाटोदा बागलाने,आष्टी तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे, पाटोदा तालुका कृषी अधिकारी पवार,शिरूर का.तालुका कृषी अधिकारी राजेंद्र नेटके, सहाय्यक कृषी अधिकारी सचिन राऊत, सरपंच परिषद तालुकाध्यक्ष सुधीर पठाडे, सरपंच संदिप खटाळ, सरपंच युवराज पाटील, रोजगार सेवक संघटना महा.राज्य हनुमंत पोठरे, रोजगार सेवक संघटनेचे आंदुरे, आष्टी तालुका ग्रामसेवक संघटनेचे प्रमुख लोंढे, पाटोदा तालुका ग्रामसेवक संघटना प्रमुख नागरगोजे,ग्रामसेवक संघटना शिरूर का. अशोक मिसाळ यांच्यासह महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक संघटना,डी.एन.ई.-१३६,कृषी विभाग,ग्रामरोजगार सहाय्यक संघटना आष्टी-पाटोदा-शिरूर कासारचे बहुसंख्य पदाधिकारी,सरपंच, उपसरपंच,ग्रा.पं.सदस्य आदी उपस्थित होते.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार ३१ डिसेंबर २०२४
https://lokaarambh.com



# सिंदफणा स्कूलच्या विद्यार्थ्यांची राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेसाठी निवड

माजलगाव । प्रतिनिधी विद्याभवन शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सिंदफणा पब्लिक स्कूलच्या १४ व १७ वर्षाखालील संघांनी राष्ट्रीय स्तरावर आपले स्थान निर्माण केले आहे. या खेळाडूंची महाराष्ट्र राज्य तिसऱ्या युथ गेम्स चॅम्पियनशिप २०२४-२५ अंतर्गत राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. खेळाडूंच्या या कामगिरीबद्दल शाळा तसेच बीड जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्रात आनंद व्यक्त होत असून सर्व स्तरांतून कौतुकाचा वर्षाव होत आहे. सोलापूर येथे दिनांक २८ ते २९ डिसेंबर २०२४ दरम्यान १४,१७ वर्षांखालील मुला-मुलींच्या राज्यस्तरीय क्रिकेट क्रीडा स्पर्धेचे आयोजन जिल्हा क्रीडा संकुल, गुरुनानक चौक, कुमठा नाका, सोलापूर येथे करण्यात आले होते. या स्पर्धेत सिंदफणा पब्लिक स्कूलच्या खेळाडूंनी बीड जिल्ह्यामधून प्रतिनिधित्व करत क्रिकेट स्पर्धेत सहभाग नोंदवला होता.या स्पर्धेत सिंदफणा पब्लिक स्कूलच्या १७ वर्षाखालील मुले या संघाने परभणी, धाराशिव,



सोलापूरच्या संघांना हरवत प्रथम क्रमांक पटकावला. तर १४ वर्ष मुली या संघाने धाराशिव व सोलापूर या संघांना धुळचाखात प्रथम क्रमांक पटकावला. शाळेच्या खेळाडूंनी आपल्या उत्कृष्ट कौशल्याने स्पर्धकांना मागे टाकत दि.०६ ते ०८ जानेवारी २०२५ दरम्यान गोवा येथे होणाऱ्या राष्ट्रीय पातळीवरील क्रिकेट स्पर्धेत संधी मिळवली आहे.खेळाडूंनी आपल्या राज्यस्तरावरील क्रीडा कौशल्याच्या जोरावर शाळेचा व बीड जिल्ह्याचा नावलौकिक वाढवला आहे. त्यांच्या या यशामुळे विद्यार्थ्यांमध्ये मोठी प्रेरणा निर्माण झाली असून, शाळा आणि क्रीडा क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना शाळेचे अध्यक्ष आमदार प्रकाश सोळंके, उपाध्यक्ष विरेन सोळंके, सचिव मंगलताई सोळंके, समन्वयक नीला देशमुख, प्राचार्य अन्वर शेख, उपप्राचार्य राहुल कदम, शाळेचे क्रिडा संचालक दीपक माने, क्रीडा शिक्षक सचिन मंजुळे, पुरुषोत्तम सोळंके, वैशाली सोळंके, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि पालक यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत हे विद्यार्थी आपले कौशल्य सिद्ध करतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# मुदखेड मराठा सेवा संघाची तालुका कार्यकारणी जाहीर

## तालुकाध्यक्ष पदी शिवानंद पवार सचिव पदी सचिन मगरे कार्याध्यक्ष पदी अजय सरसे यांनी निवड



नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

मुदखेड : मराठा सेवा संघाची नूतन कार्यकारणी बैठक दि-२८-नोव्हेंबर रोजी दुपारी ४ वाजता राजश्री शाहू माध्यमिक विद्यालय मुदखेड येथे पार पडली.प्रारंभी राजमाता जिजाऊ छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून जिजाऊ वंदनेने बैठक प्रारंभ करण्यात आली.मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष पंडितराव कदम अँड सतीशकुमार जाधव, जिल्हा उपाध्यक्ष हौसाजीराव गाढे,श्री.खुडे श्री.कदम यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक पार पडली.सर्वानुमते मराठा सेवा संघाच्या मुदखेड तालुका अध्यक्षपदी शिवानंद पवार निवघेकर तालुका कार्याध्यक्षपदी प्रा.अजय सरसे तालुका सचिव पदी सचिन पाटील मगरे कोषाध्यक्षपदी व्यंकटराव नन्नवरे तालुका संघटक पदी पंडितराव पाटील दीपक शेळके, सल्लागार पदी प्रा.आनंदराव वडजे ,सहसंघटक पदी गणेशराव शिंदे तालुका उपाध्यक्षपदी बाबुराव कदम,दादाराव शिंदे ,सूर्यभान शिंदे ,व्यंकटराव मोरे प्रसिद्धी प्रमुख पदी प्रतापराव पवळे यांची एकमताने निवड करण्यात आली. तालुका कार्यकारणी गठीत करून सर्व नवनिर्वाचित पदाधिका-्यांना जिल्हाध्यक्ष पंडितराव कदम अँड सतीशकुमार जाधव जिल्हा उपाध्यक्ष हौसाजीराव गाढे यांनी मराठा सेवा संघाच्या वाटचालीविषयी सविस्तर मार्गदर्शन केले व सर्व नवनिर्वाचित पदाधिका-यांना शुभेच्छा दिल्या.यावेळी हनुमंत नटूरे, ऋषिकेश पारवेकर ,प्रा.बालाजी जाधव ,अमोल आबादार ,माधव गाढे पंडित गाढे, मारुती गाढे, सिंधीकर, शिंदे नागेलीकर ,कराळे , पवार ,अनिल पाटील आदी उपस्थित होते.

# गुन्हेगारांचे शस्त्र परवाने तातडीने रद्द करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन



बीड। प्रतिनिधी बीड जिल्ह्यात जानेवारी २०२४ ते नोव्हेंबर २०२४ या गेल्या ११ महिन्यात ४० खुन,खुन करण्याचा प्रयत्न केल्याच्या १७८ तसेच गर्दी करून मारामारी करणे, दंगल घडवणे यासारखे ४९८ गुन्हे तसेच बीड जिल्ह्यातील महिला व मुली सुरक्षित नसुन १६६ अत्याचाराच्या घटना तर विनयभंग, छेडछाडीच्या ४१३ घटना घडल्याची पोलिस दरबारी नोंद आहे.तत्कालीन पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांनी कमीत कमी २ आणि जास्तीत जास्त १६ गुन्हे दाखल असलेल्या २४५ जणांची जिल्हा विशेष शाखेकडून माहिती घेऊन जिल्हाधिका-यांना परवाना रद्द करण्याची शिफारस केली होती.जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी वाळुमाफिया, अपहरण,खुन, खंडणी,मटका बहाद्दर, गोळीबार या सारखे गंभीर गुन्ह्यांची शासन दरबारी नोंद असलेल्या शस्त्र परवाना धारकांचे परवाने रद्द करण्यात यावेत आणि याप्रकरणी गांभीर्य नसलेल्या जिल्हा प्रशासनाच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.३० सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर खेळणीतील पिस्तूलाने टिकल्या उडवत लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले. जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत गृहमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना निवेदन देण्यात आले यावेळी आंदोलनात रामधन जमाले (इंटक) बीड जिल्हाध्यक्ष,माजी सैनिक अशोक येडे जिल्हाध्यक्ष आप, नितिन सोनावणे जिल्हाध्यक्ष ऑल इंडिया पँथर सेना,शेख युनुस,सुदाम तांदळे,शिवशर्मा शेलार, शेख मुबीन, शेख मुस्ताक,आदी सहभागी होते.तसेच सायं दैनिक अभिमानचे संपादक राजेंद्रकुमार होळकर, दैनिक पाटोदा संचारचे संपादक विलास डोळे, मराठी पत्रकार परीषदेचे बीड जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके यांच्या निवेदनावर स्वाक्षरी आहेत. बीड जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था बिघडली असुन सामान्यांसह महिला असुरक्षित आहेत.२०२३ च्या तुलनेत यावर्षी १ हजार १४७ गुन्ह्यांची वाढ झाली आहे. आठवड्याला एक खुन तर दोन दिवसाला खुनाचा प्रयत्न अन अत्याचार होतोय. गेल्यावर्षी २०२३ मध्ये ११ महिन्यात ६२ खुन तर यावर्षी २०२४ मध्ये ४० खुनांची नोंद, २०२३ मध्ये १७८ खुनांचा प्रयत्न तर २०२४ मध्ये १७८ खुनाच्या प्रयत्न घटनांची नोंद आहे.२०२३ मध्ये अत्याचाराचे १५७ गुन्हे दाखल होते तर २०२४ मध्ये १६६ गुन्हे दाखल आहेत.विनयभंगाच्या गुन्ह्याबाबत २०२३ मध्ये ४०५ गुन्हे दाखल होते तर २०२४ मध्ये ४१३ एवढे गुन्हे दाखल आहेत. गर्दी आणि मारामारीच्या घटना २०२३ मध्ये ३९१ तर २०२४ मध्ये ११ महिन्यात ४६४ गुन्ह्यांची नोंद पोलिस ठाण्यात आहे.

# चला लोकनेते विनायकराव मेटे यांनी सुरू केलेल्या व्यसनमुक्ती लढ्यात सहभागी होवू

बीड । प्रतिनिधी थर्टी फर्स्टच्या नावाखाली डर्टी मुहूर्त साधत नवतरुण व्यसनाधीनतिकडे वळले जातात तरुणांनी व्यसनाधीनतेकडे न जाता सजग समाजासाठी निर्व्यसनी राहावे या उदात्त हेतूने लोकनेते स्व. विनायकराव मेटे यांनी गेल्या अनेक वर्षापासून ३१ डिसेंबर रोजी विविध सांस्कृतिक कार्यक्रम आणि जनजागृतीच्या माध्यमातून युवकांनी दारू ऐवजी गरमागरम दुधासोबत नववर्षाचे स्वागत करावे ही संकल्पना अंमलातआणून कार्यक्रमाचे आयोजन केले होते. व्यसनमुक्तीचे अभियान पुढे चालवण्यासाठी यंदा देखील व्यसनमुक्ती अभियाना अंतर्गत जनजागृती रॉलीचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती शिवसंग्रम अध्यक्ष डॉ ज्योती विनायकराव मेटे यांनी दिली आहे. लोकनेते स्व. विनायकरावजी मेटे साहेब यांच्या प्रेरणेने प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी व्यसनमुक्त बीड अभियाना या उपक्रमा अंतर्गत अंतर्गत व्यसनमुक्ती जनजागृती महारॅलीचे दी ३१ डिसेंबर रोजी आयोजन केले आहे. हि रॅली सकाळी ०८.०० वा. श्रीमंतयोगी छत्रपती शिवाजी महाराज क्रिडांगणा पासुन आरंभ होईल व डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नगर रोड,

# बीड, धाराशिवनंतर आज बुलढाण्यातही मराठा समाजाच्यावतीनं मोर्चा,



बुलडाणा । प्रतिनिधी बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणावरुन राज्यातील वातावरण चांगलच तापलं आहे. संतोष देशमुख यांची हत्या करणाऱ्या आरोपींना तात्काळ शिक्षा करा, या मागणीसाठी बीड जिल्ह्यानंतर धाराशिवनंतर आज बुलढाण्यात मोर्चा काढण्यात आला. आरोपींना तात्काळ अटक करा, हा खटला फास्टट्रॅक कोर्टात चालवा, या मागण्यासाठी आज बुलढाण्यातील सिंदखेड राजा इथे मराठा समाज बांधवांकडून राजमाता जिजाऊ यांचे जन्मस्थान राजवाडा ते तहसील कार्यालय असा मोठा मोर्चा काढण्यात आला. मराठा बांधवांच्या वतीनं तहसीलदारांना निवेदन बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या करणाऱ्या आरोपींना तात्काळ पकडा. हा खटला फास्टट्रॅक कोर्टात चालवा, अशा मागण्या घेऊन आज बुलढाण्यातील सिंदखेड राजा इथं मराठा समाज बांधवांकडून राजमाता जिजाऊ यांचे जन्मस्थान राजवाडा ते तहसील कार्यालय असा मोठा मोर्चा काढण्यात आला.

# सुरेश धस नरमले, प्राजक्ता माळींची मागितली माफी, नेमकं काय म्हणाले ?

मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर बोलताना आमदार सुरेश धस यांनी अभिनेत्री प्राजक्ता माळी यांच्या नावाचा उल्लेख केला होता. यावरून वातावरण चांगलंच तापलं होतं. त्यानंतर प्राजक्ता माळी यांनी पत्रकार परिषद घेऊन सुरेश धस यांनी आपली माफी मागवी अशी मागणी केली होती. मात्र मी काही चुकीचं बोललो नाही, प्राजक्ता ताईचा अपमान होईल असं बोललो नाही, मी माझ्या वक्तव्याचं समर्थन करतो त्यामुळे माफी मागणार नाही अशी भूमिका यावर सुरेश धस यांनी घेतली होती. मात्र त्यांनी आता प्राजक्ता माळी यांची माफी मागितली आहे.नेमकं काय म्हणाले सुरेश धस?

सुरेश धस यांनी प्राजक्ता माळी यांची माफी मागितली आहे. प्राजक्ता माळी यांच्याबद्दल केलेल्या वक्तव्याप्रकरणी सुरेश धस यांनी दिलगिरी व्यक्त केली आहे. ङ्गप्राजक्तताताई माळी यांच्या संदर्भात मी केलेल्या वक्तव्याचा गैर अर्थ काढण्यात आला आहे, मला त्यांचा अपमान करायचा नव्हता किंवा त्यांच्या चारित्र्याबाबत बोलण्याचा तर प्रश्नच नव्हता. मी प्राजक्ता ताई आणि समस्त स्त्रियांबाबत आदर बाळगतो. माझ्या विधानाने जर त्यांचे किंवा कुणाचेही मन दुखावले असेल तर मी दिलगिरी व्यक्त करतो, असं सुरेश धस यांनी म्हटलं आहेप्राजक्ता माळींनी घेतली होती मुख्यमंत्र्यांची भेट सुरेश धस यांच्या वक्तव्यानंतर प्राजक्ता माळी यांनी पत्रकार परिषद घेतली होती, या पत्रकार परिषदेमधून त्यांनी आपली भूमिका मांडली. सुरेश धस यांनी आपली माफी मागावी अशी मागणी त्यांनी केली होती. त्यानंतर मी प्राजक्ता ताईचा अपमान होईल असं बोललो नाही, त्यामुळे मी माफी मागणार नाही असं सुरेश धस यांनी म्हटलं होतं. त्यानंतर याच संदर्भात प्राजक्ता माळी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची देखील भेट घेतली होती. अखेर आता सुरेश धस यांनी प्राजक्ता माळी यांची माफी मागितली आहे. मी प्राजक्ता ताई आणि समस्त स्त्रियांबाबत आदर बाळगतो. माझ्या विधानाने जर त्यांचे किंवा कुणाचेही मन दुखावले असेल तर मी दिलगिरी व्यक्त करतो, असं सुरेश धस यांनी म्हटलं आहे.

# संतोष देशमुख हत्या ही राज्याच्या अस्मितेला कलंक लावणारी घटना-ना. रामदास आठवले

केज। प्रतिनिधी संतोष देशमुख यांची हत्या ही महाराष्ट्रासारख्या पुरोगामी समाजाला राज्याच्या अस्मितेला कलंक लावणारे घटना असून या हत्याकांड आणि खंडणी प्रकरणातील सर्व आरोपींना तात्काळ अटक करण्यात यावी. तसेच या प्रकरणाचा तपास जलद गतीने करण्यात यावा. यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि मुख्यमंत्र्याची देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असल्याचे केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी मस्साजोग येथे संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांची भेट घेऊन प्रसार माध्यमाशी बोलताना सांगितले. केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी दि. ३० डिसेंबर रोजी मस्साजोग येथे सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबाची भेट घेवून सांत्वन केले. यावेळी त्यांच्या सोबत युवा प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे, बाबुराव कदम, मिलिंद शेळके यांच्यासह रिपाईचे नेते उपस्थित होते बीड जिल्ह्यातील मस्साजोग तालुका केज येथील सरपंच संतोष देशमुख यांची हत्या ही पुरोगामी समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्र राज्याच्या अस्मितेला कलंक लावणारी आहे तसेच यां घटनेपूर्वी पवन ऊर्जा प्रकल्पात घडलेल्या घटनेची येथील सुरक्षा रक्षाच्या मारहाणीची प्रकरणी पोलिसांनी ट्रॉसिटीची तक्रार दाखल करून घेतली असती तर कदाचित ही घटना टाळता आली असती म्हणून जिल्ह्यात आणि राज्यात पोलिसांच्या कार्यपद्धतीवर रोष व्यक्त होत आहे. या घटनेतील गुन्हेगारांची प्रॉपर्टी जप्त करून भागणार नाही तर यातील आरोपींना पकडणे आवश्यक आहे. चार आरोपी पकडले असून अद्यापही तीन आरोपी फरार आहेत. इतर आरोपी ताब्यात घ्यायला एवढा वेळ लागतो ? महाराष्ट्र



पोलीसासाठी ही चांगली नाही पोलिसांनी दवाखाली काम करू नये. हे जे प्रकरण आहे ते अत्यंत गंभीर आहे. सुरक्षा रक्षक अशोक सोनवणे हा सोलार प्रकल्पात काम करीत होते त्यांना मारहाण झाल्यामुळे संतोष देशमुख हे भांडण सोडवायला गेले होते. त्यामध्ये ट्रॉसिटी लावणे अत्यंत आवश्यक होते. जर ट्रॉसिटी लावली असती आणि आरोपींना पकडले असते तर ही घटनाच घडली नसती. यामुळे पोलीसावर लोकांचा संशय आहे. हे अत्यंत गंभीर आहे. केज आणि बीड येथील पोलिसांवर लोकांचा संशय आहे. जिल्हा पोलीस अधीक्षकांची बदली झालेली आहे. नवीन आलेल्या जिल्हा पोलीस अधीक्षकांनी यात लक्ष घालावे. यासंदर्भात मी या सदर्भात मी त्यांच्याशी बोलणार आहे. असे रामदास आठवले म्हणाले. तसेच मुख्यमंत्र्यांशी देखील ते बोलणार आहेत. देशमुख कुटुंबीयांना न्याय मिळाला पाहिजे. संतोष देशमुख यांची आई आणि त्यांच्या कुटुंबीयांची त्यांनी भेट घेतले आहे. या कुटुंबाला न्याय मिळाला पाहिजे अशी त्यांची आणि रिपब्लिकन पार्टीची मागणी आहे. असे तेंमहबके. तर या प्रकरणी ते केंद्रीय गृहमंत्री अमित शाहा यांची देखील भेट घेणार आहेत. परंतु त्या अगोदर ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची देखील भेट घेणार आहे. या प्रकरणातील सर्व आरोपी आणि त्यांचे मास्टरमइंड यांना तात्काळ अटक झाली पाहिजे. ही घटना घडवून २१ दिवस लोटले आहेत. तरी अद्याप पर्यंत सर्व आरोपी अटक झालेले नाहीत. हे आश्चर्य आहे. अद्याप पर्यंत पोलिसांनी देशमुख यांच्या कुटुंबीयातील कोणाचेही स्टेटमेंट घेतलेले नाही. घटना घडल्या नंतर पहिल्या दोन-तीन दिवसांमध्ये पोलिसांनी त्यांचे स्टेटमेंट घेणे आवश्यक होते. अशा प्रकरणांमध्ये त्या कुटुंबाचे लवकरात लवकर स्टेटमेंट घेतले जातात पण पोलिसांनी त्यांचे लवकरात लवकर विनाविलंब स्टेटमेंट घ्यावे. या प्रकरणाची सविस्तर चौकशी करून उर्वरित सर्व आरोपी यांना तात्काळ ताब्यात घेण्यात यावे. त्या आरोपींना पकडलेच पाहिजे अशी आमची भूमिका असून सर्व आरोपी आणि त्याचा सूत्रधार यांच्या अटकेची मागणी रामदास आठवले यांनी केली आहे. यावेळी त्यांच्या सोबत राजू जोगदंड, महावीर सोनवणे, अशोक साळवे, किशोर कांडेकर, अविनाश जावळे, किसन तांगडे, मझर खान, सुरेश माने, रविराज माळाळे, मायाताई मिसळे, राणी गायकवाड, गोवरर्धन वाघमारे, उत्तम आप्पा मस्के, बापू पवार, सादेक कुरेशी, भाई उजगरे, महादेव उजगरे, अरुण निकाळजे, अरुण भालेराव, दीपक कांबळे, धोंडीराम सिरसट, प्रमोद दासुद, सुभाष तांगडे, संदीपान डोंगरे, राहुल सरवदे, अविनाश जोगदंड, सतीश शिनगारे, प्रभाकर चांदणे, विलास जोगदंड, शाम विर, नागेश दुबळे, भाऊसाहेब दळवी, रतन वाघमारे, संभाजी गायकवाड, ईश्वर सोनवणे, राजेश सोनवणे, अक्षय कोकाटे, धम्मा पारवेकर आणि दिलीप बनसोडे, रवी जोगदंड, गौतम बचुटे, सूरज काळे, हरेंद्र तूपारे, प्रशांत हजारे, हरीश गायकवाड, दादाराव धेंडे, विनोद शिंदे, रोहित कांबळे, रोहित बचुटे आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार ३१ डिसेंबर २०२४
https://lokaarambh.com


## खाजगी दवाखान्यात मावश्या करतात नर्सेसचे कामे

बीड दि.३० (प्रतिनिधी): जिल्ह्याच्या आरोग्याची नाडी सुशिक्षित सुरक्षितांच्या हाती असली पाहिजे मात्र जिल्ह्यातील खाजगी रूग्णालयातील डॉक्टरांकडून चक्क कमी मानधनमध्ये कामाला मिळत असल्याने मावश्यांच्या हातून रूग्णांच्या सलाईन लावणे, काढणे तसेच विविध कामे केली जात असल्याने नागरिकांच्या आरोग्यामध्ये अनेक परिणाम होतांना दिसून येत आहे. यामुळे जिल्ह्याच्या आरोग्याची नाडी बिघडत चालली असल्याचे दिसून येत आहे. बीड शहरासह जिल्ह्यातील विविध खाजगी रूग्णालयामध्ये अपवाद काही रूग्णालय वगळले तर बहुतांश दवाखान्यात काम करणाऱ्या नर्स हे नर्सिंगचे शिक्षण न घेताच रूग्णालयात मावश्याचे काम करून शिकलेले असल्याचे दिसून येते. मात्र याबाबत डॉक्टरांकडून विचारणा न करताच चक्क अनुभव असल्याचे सांगितल्यानंतर कामावर घेत रूग्णांच्या जीवाशी खेळले जात असल्याचे दिसून येते. नर्सिंग शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांकडून कमी पगारीमध्ये काम केले जात नसल्याने डॉक्टरांकडून हा पर्याय शोधून घेत मावश्यांना नर्सच्या कामाला लावले जात असल्याचे दिसते. जिल्ह्यातील अनेक रूग्णालयामध्ये हा प्रकार दिसून येईल मात्र याकडे जिल्ह्यातील आरोग्य विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे सर्रासपणे दुर्लक्ष असल्याचे दिसून येते. यामुळे याकडे जिल्हाधिकारी यांनी विशेष लक्ष घालून खाजगी रूग्णालयातील कर्मचाऱ्यांच्या कागदपत्राची तपासणी करण्याचे मागणी केली जात असल्याचे दिसून येते. बहुतांश मोठ्या खाजगी रूग्णालयामध्ये तज्ञ डॉक्टरांच्या हाताखाली काम करणारे डॉक्टरही बोगस डिग्रीचे असल्याचे दिसून येते. एवढ्या वर्षापासून एखाद्या रूग्णालयामध्ये काम करूनही कसल्याची प्रकारची आरोग्य सेवे करता येत नसल्याचे दिसून येते. यामुळे खाजगी रूग्णालयाला परवानगी देतांना रूग्णालयामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्याही कागदपत्राची सक्ती करण्याचे काम वरिष्ठांकडून केले पाहिजे अशी मागणी केली जात आहे.

# संतोष देशमुख यांचे भाऊ धनंजय देशमुख यांनी बीड पोलिसाना भेटून तपासाची माहिती घेतली.

## सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात नवी अपडेट

**बीड,/प्रतिनिधी**

केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाला आता २२ दिवस झाले आहेत. पण तरीही या प्रकरणातील संशयित आरोपी वाल्मिक कराड फरार आहे. त्यामुळे वाल्मिक कराडला अटक करण्याची मागणी केली जात आहे. या प्रकरणाचा तपास सीआयडीकडून सुरु आहे. सीआयडीकडून आतापर्यंत वाल्मिक कराडच्या संपर्कात असलेल्या आतापर्यंत १०० पेक्षा जास्त जणांची चौकशी झाली आहे. या दरम्यान आज महत्त्वाची घडामोड घडली. संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख आज बीड पोलीस ठाण्यात पोहोचले. तपास कुठपर्यंत आला? याची माहिती घेण्यासाठी ते स्वत:हून पोलीस ठाण्यात पोहोचले. त्यांनी एका अधिका=याची भेट घेतली. त्यानंतर ते पोलीस ठाण्यातून बाहेर पडले. यानंतर त्यांनी



माध्यमांना प्रतिक्रिया दिली.

ङ्गआम्ही गुजर साहेबांना दोन मिनिट भेटलो. आम्ही आल्यापासून बसलो होतो. ते चौकशीसाठी बाहेर गेले होते. ते आल्यानंतर त्यांना भेटलो. त्यांनी सांगितलं होतं की तुम्ही केजला या. चौकशी कुठपर्यंत आली ते सांगू. सीआयडी कार्यालयात ज्योती जाधव नावाच्या महिलेची चौकशी सुरु आहे. आम्ही स्वत:हून आलो होतो. आम्ही गुजर साहेबांना भेटलो. जास्त काही बोलणं झालं नाही. आम्ही उद्या सविस्तर भेटणार आहोत. त्यांनी आम्हाला शब्द दिला आहे की, एक-दोन दिवसांत आरोपीला अटक होईलङ्क, अशी प्रतिक्रिया धनंजय देशमुख यांनी दिली.

मी तुम्हाला काहीच चुकीचं बोललो नाहीफ

ङ्गमी नाराज यासाठी आहे की, आईची तब्येत खराब आहे. घटनेला २० दिवस झाले. मी तुम्हाला बोलतोय, तुम्ही जे काम करत आहात त्यावर मी तुम्हाला काहीच चुकीचं बोललो नाही. मी दररोज येणा-या लोकांशी बोलतोय, प्रसारमाध्यमांशी रोज बोलतोय. अनेक लोक सांत्वनासाठी येत आहेत. त्यांच्याशी बोलतोय. कारण ते सांत्वनासाठी येत आहेत. आपण त्यांनाच बोललो नाही तर त्यांना आपण बोललो नाही, असं वाटायला नको. हे काम सातत्याने सुरु आहे त्यामुळे तुम्हाला नाराज चेहरा दिसत आहेङ्क, असं धनंजय देशमुख यांनी सांगितलं.

### आम्हाला उद्या सर्व माहिती कळेल

मी सीडीआरबद्दल विचारलं. त्यांनी आपण उद्या सांगतो, असं सांगितलं. याबाबत उद्या सविस्तर बोलतो. आम्ही उद्या सीआयडीच्या टीमकडून माहिती घेणार आहोत. त्यानंतर मी तुमच्यासोबत बोलेन. कारण अर्धवट माहिती घेऊन आज बोललो तर ते चुकीचं होईल. आम्हाला उद्या सर्व माहिती कळेल तेव्हा माहिती घेऊन तुम्हा सर्वांना मी सांगेन. मी तुमच्यापासून कुठेही दूर गेलेलो नाही. माझी एक विनंती आहे की, मी आतापर्यंत असं म्हटलो आहे, माझ्या भावाच्या हत्येत जे कुणी सहआरोपी आहेत त्यांना शंभर टक्के शिक्षा व्हायला पाहिजे. मी न्याय घेतल्याशिवाय मागे सरकणार नाहीङ्क, अशी देखील प्रतिक्रिया धनंजय देशमुख यांनी दिली.

# विद्यापीठ युवक महोत्सवात सावरकर महाविद्यालयाला तीन पारितोषिक

बीड दि.३० (प्रतिनिधी): डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर द्वारा आयोजित केंद्रीय युवक महोत्सवात शास्त्रीय गायन प्रथम, काव्यवाचन द्वितीय, मृदुमूर्तिकला तृतीय ही तीन पारितोषिके मिळाली आहेत. लोकनाट्य जलसा आणि भजन या प्रकाराचेही महाविद्यालयाने उत्कृष्ट सादरीकरण केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या युवक महोत्सवात महाविद्यालयाचा संघ सहभागी झाला होता. महाविद्यालयाने भारतीय शास्त्रीय गायन, सुगम गायन, तालवाद्य, भजन मृदूमूर्तीकला, काव्यवाचन, रांगोळी, जलसा, लोकनाट्य, स्पॉट फोटोग्राफी, शोभायात्रा या कलाप्रकारांमध्ये सहभाग नोंदवला. भारतीय शास्त्रीय गायन प्रकारात महाविद्यालयाचा विद्यार्थी चिरंजीव वेद दीपक मुळे याने उत्कृष्ट सादरीकरण केले आणि प्रथम क्रमांक पटकावला. त्याला गुरुवर्य पंडित हेमंत पेंडसे ,गुरुवर्य श्री. नामदेव साळुंके , पालक, तसेच संगीत विभाग प्रमुख डॉ. रूपाली कुलकर्णी, श्रीमती दीपा देशपांडे, श्रीमती. आसावरी राऊत यांचे मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयाची विद्यार्थिनी कुमारी अंजली जालिंदर शिंदे हिने काव्यवाचन प्रकारामध्ये द्वितीय पारितोषिक पटकावले. मृदुमूर्तीकला या कलाप्रकारात कु. ऋतुजा काळे हिने तृतीय क्रमांक पटकावला. तिला डॉ. जोगेंद्र गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच महाविद्यालयाने जलसा या सांघिक कलाप्रकारात डॉ. जोगेंद्र गायकवाड लिखित जलस्याचे उत्तम सादरीकरण केले. प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद या जलशाला मिळाला.महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉ. सुहास मोराळे सर यांचे युवक महोत्सवातील सर्व संघास मार्गदर्शन व सहकार्य लाभले. पुरुष संघ प्रमुख म्हणून सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री. राम् गव्हाणे आणि डॉ. जोगेंद्र गायकवाड, डॉ. रुक्मिणीकांत पांडव आणि महिला संघ प्रमुख म्हणून डॉ. रुपाली कुलकर्णी आणि कु. आसावरी राऊत यांनी संघास प्रेरणा दिली. भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्रजी आलूरकर, कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य,संस्थेचे प्रशासकीय अधिकारी प्रा. चंद्रकांत मुळे,कोषाध्यक्ष सत्यनारायण लोहिया, केंद्रीय कार्यकारणी सदस्य उमेश जगताप, सावरकर संकुलाचे अध्यक्ष डॉ. पि.के कुलकर्णी, कार्यवाह डॉ. अविनाश देशपांडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे, उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, उपप्राचार्य डॉ. उत्तम साळवे संघास विजयी संघाचे मनस्वी अभिनंदन केल

## आजी निर्मला खटोड यांच्या प्रेरणेने नातवंडांनी विविध संस्थेला पन्नास कोटीची जागा केली दान

बीड दि.३० (प्रतिनिधी): बीड शहरामध्ये स्व.झुंबरलालजी खटोड यांचे कुटूंबीय ६० वर्षापासून वास्तव्य करीत आहे. या शहारचे आपण काही देणं लागतो ही सद्भावना कायम स्व.झुंबरलालजी खटोड यांची असायची. त्यांच्या परिने ते सामाजिक कार्य करीत असायचे. त्यांच्या जाण्यानंतर खटोड परिवाराने प्रतिष्ठानची स्थापना केली. गत २५ वर्षापासून संत विचार समाजात पेरण्याचे काम केले. श्रीमती निर्मला झुंबरलालजी खटोड यांच्या प्रेरणेतून नातू शुभम, आशिष, श्रध्दा, कोमल खटोड या नातवंडांनी विविध संस्थेला समाजोपयोगी कार्यासाठी पन्नास कोटीची जागा दान केली आहे. राष्ट्रसंत आनंदऋषीजी महाराज अहिल्यानगर यांची १२५ वी जन्म जयंती संपूर्ण भारतभर जैन समाज साजरी करीत आहे. त्यांनी दिलेल्या उपदेशाप्रमाणे सर्वसामान्य, शेतकरी, कष्टकरी यांच्यासाठी जैन सोशल फेडरेशन अहिल्यानगर येथे प.पू.आदर्शऋषीजी महाराज यांच्या नेतृत्वाखाली आरोग्य सेवेचा उपक्रम ३२ वर्षापासून चालू आहे. याच संस्थेला म्हणजे जैन सोशल फेडरेशन अहिल्यानगर या संस्थेला फुलाई नगर बीड येथे दवाखाना व शाळेसाठी ४० कोटी रुपयांची जागा दान केली. तसेच वारकरी संप्रदायाचे संत विचार बालमनावर रुजवण्यासाठी व गोसेवा करण्यासाठी धुळे-सोलापूर महामार्गावरील पेंडगाव जवळ १० कोटी रुपयांची शेत जमीन खटोड प्रतिष्ठानला दान देण्यात आली. नातू शुभम, आशिष, श्रध्दा, कोमल या नातवंडांनी पुढाकार घेवून हे सर्व कार्य केले. स्व.झुंबरलालजी खटोड यांची भावना असायची आपण ग्रामदैवत खंडेश्वरी देवीच्या परिसरात कष्टकरी लोकांमध्ये निवास करत आहोत. सर्व सामान्य समाज बांधवांना आगदी कमी दरात वैद्यकीय सेवा मिळावी, कष्टकरी व सर्वसामान्य समाजाच्या मुला- मुलींना जागतिक दर्जाचे शिक्षण मिळावं अशी भावना असायची. हा योग अतिशय अनुभव असलेली अहिल्यानगर येथील जैन सोशल फेडरेशन यांनी निर्णय घेतला. बीड शहरामध्ये सर्व मेडिकल सुविधा बीड जिल्ह्यातीलकष्टकरी, ऊसतोड कामगार व सर्वसामान्यांना अल्पदरामध्ये किंवा सर्व शासकीय योजनेमध्ये मिळावी या करीता हॉस्पिटल उभारणीचा निर्णय घेतला. लवकरच सीबीएससी पॅटर्नची प्ले ग्रुप ते १२ वी पर्यंतचे शिक्षण संकुल उभा करुन बीड शहरातील आजू-बाजुच्या परिसरातील बालमनावर शिक्षणा बरोबर अध्यात्मिक व राष्ट्रप्रेम शिक्षण बिंबवण्याकरीता प्रयत्न सकल जैन समाज बीडच्या मदतीने हे दोन्ही प्रकल्प जैन सोशल फेडरेशन उभा करणार आहे




## राज्यात सर्व ग्रामपंचायतींचे कामकाज दोन जानेवारीपासून तीन दिवस बंद

बीड दि.३० (प्रतिनिधी) बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या झाल्याची धक्कादायक घटना काही दिवसांपूर्वी घडली. राज्यात सतत सरपंचांवर होणारे जीवघेणे हल्ले, अशा घटनांच्या निषेधार्थ राज्यभरातील सर्व ग्रामपंचायतींचे कामकाज येत्या ३१ डिसेंबर ते २ जानेवारी दरम्यान ३ दिवस बंद ठेवून शासनाचे लक्ष वेधण्याचा निर्णय महाराष्ट्र प्रदेश सरपंच संघटनेने घेतला आहे. महाराष्ट्र प्रदेश सरपंच संघटनेतर्फे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदनही देण्यात आले आहे. बीड जिल्ह्यातील मस्साजोग या गावचे आदर्श माजी सरपंचाचे अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली. ही घटना ताजी असतानाच पुन्हा सरपंचावरील जीवघेण्या हल्ल्याच्या दुसऱ्या घटनेने महाराष्ट्र हादरला आहे. धाराशिव जिल्ह्यातील सरपंचाच्या कारची तोडफोड करून पेट्रोलने जिवंत जाळण्याचा प्रयत्न केल्याची धक्काद-ायक घटना समोर आली आहे. यावरून सरपंच संघटना आक्रमक झाली आहे. दरम्यान, मस्साजोग प्रकरणी काही आरोपींना पोलिसांनी अटक केली. मात्र, या घटनेतील मुख्य आरोपी मात्र अद्यापही फरार आहेत. त्यांना अटक करण्याच्या मागणीसाठी आणि संतोष देशमुख यांच्या हत्येच्या घटनेच्या निषेधार्थ शनिवारी बीड जिल्ह्यात सर्वपक्षीय मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.

## स्टार्टरला हात लागताच विजेचा जोरदार झटका बसला; शेतकऱ्याचा जागीच मृत्यू



आष्टी दि.३० (प्रतिनिधी): पिकाला पाणी देऊन झाल्यावर विद्युत पंप बंद करण्यासाठी गेले असता स्टार्टरला हात लावताच विद्युत प्रवाहाचा धक्का बसल्याने तरूण शेतकऱ्याचा जागीच मृत्यू झाला. ही घटना आज, सोमवारी सकाळी साडेअकराच्या दरम्यान डोंगरगण येथे घडली. संदीप मुरलीधर कर्डीले ( ४२) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. याबाबत अधिक माहिती अशी की,आष्टी तालुक्यातील डोंगरगण येथील शेतकरी संदीप मुरलीधर कर्डिले (४२) हे सोमवारी सकाळी साडेअकराच्या दरम्यान स्वत:च्या शेतात पिकाला पाणी देत होते. पाणी देऊन झाल्यावर विद्युत मोटार बंद करताना स्टार्टरमध्ये विद्युत प्रवाह उतरल्याने त्याचा धक्का बसून संदीप दूर फेकल्या गेले. यातच त्यांचा जागीच मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात आई, भाऊ, पत्नी, मुलगा, मुलगी असा परिवार आहे. त्यांच्या मृत्यूची वार्ता समजताच गावात हळहळ व्यक्त होत आहे.

# शेतकऱ्यांचा पंजाब बंद; १५० ट्रेन रद्द!

## शेतकऱ्यांनी विविध रेल्वे मार्गांवर ठिय्या देऊन रेल्वे मार्ग रोखले होते. त्यानंतर आता पुन्हा शेतकऱ्यांनी एल्गार पुकारला आहे.



चंदीगढ : काही दिवसांपूर्वी शेतकऱ्यांच्या मागण्या पूर्ण होण्यासाठी संयुक्त किसान मोर्चा (गैरराजकीय) आणि किसान मजदूर मोर्चाच्या वतीने पंजाबमध्ये रेले रोको आंदोलनाची हाक दिली होती. यावेळी शेतकऱ्यांनी विविध रेल्वे मार्गांवर ठिय्या देऊन रेल्वे मार्ग रोखले होते. त्यानंतर आता पुन्हा शेतकऱ्यांनी एल्गार पुकारला आहे. आज किसान मजदूर मोर्चा आणि संयुक्त किसान मोर्चा यांनी पंजाब बंदची हाक दिली आहे. शेतकरी नेते जगजित सिंग डल्लेवाल हे किमान आधारभूत मूल्यासाठी कायदेशीर हमीसह आपल्या मागण्या मान्य करण्यासाठी

### मजदूर मोर्चाच्या वतीने पंजाबमध्ये रेले रोको आंदोलनाची हाक दिली होती. यावेळी शेतकऱ्यांनी विविध रेल्वे मार्गांवर ठिय्या देऊन रेल्वे मार्ग रोखले होते.

केंद्रावर दबाव आणण्यासाठी २६ नोव्हेंबरपासून खनौरी सीमेवर आमरण उपोषणासाठी बसले आहेत. मात्र अद्यापही केंद्र सरकारने काहीच निर्णय न शेतकऱ्यांनी पुन्हा आक्रमक भूमिका धारण केली आहे. शेतकऱ्यांनी पंजाब बंदची हाक दिली असून सकाळी ७ ते दुपारी ४ वाजेपर्यंत अनेक ठिकाणी रेल्वे ट्रॅक रोखून प्रवासी आणि मालगाड्यांची वाहतूक विस्कळीत करणार आहेत. त्यामुळे रेल्वे प्रशासनाने १५० ट्रेन रद्द केल्या आहेत. मात्र यामुळे प्रवाशांचा खोळंबा होणार असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. कोणत्या ट्रेन रद्द? उत्तर रेल्वेने ३ वंदे भारत एक्स्प्रेससह नवी दिल्लीहून कालका, चंदीगड आणि अमृतसरकडे धावणाऱ्या ३ शताब्दी एक्स्प्रेस आणि पंजाब, हरियाणा, चंदीगड, जम्मू आणि काश्मीर, हिमाचल प्रदेश आणि उत्तर प्रदेशमध्ये धावणाऱ्या अनेक ट्रेन रद्द करण्यात आल्या आहेत. दरम्यान, यावेळी प्रवाशांना त्रास न होण्यासाठी अंबाला पोलिसांनी दिल्ली आणि चंदीगड दरम्यान प्रवास करणाऱ्या प्रवाशांना -४४ मार्गे पंचकुला, बरवाला, मुल्लाना, यमुनानगर, रादौर, लाडवा आणि पिपली येथे पर्यायी मार्गाने जाण्याचे आवाहन केले

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,-Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com